**DNS BANK**
**डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

नोंदणी क्रमांकः टी.एन.ए./बी.एन. के./१२७, दिनांक ०४ जुलै १९७०
नोंदणी क्रमांकः एम.एस.सी.एस./सी.आर./१२७५/२०१७, दिनांक २८ जुलै २०१७
भारतीय रिझर्व्ह बँक लायसन्स : एसीडी. एमएच.- २२७ (पी) दिनांक ०९-१०-१९८०
मधुकुंज, प्लॉट क्रमांक पी-५२, एम.आय.डी.सी. फेज-२, कल्याण-शीळ मार्ग, सोनारपाडा, डोंबिवली (पू)-४२१ २०४.

# ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

वार्षिक सर्वसाधारण सभेला एक महिन्याची मुदतवाढ मिळावी यासाठी मा. केंद्रीय सहकार आयुक्त, नवी दिल्ली यांचेकडे अनुमती मागणारे पत्र बँकेने दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजीच पाठविले आहे, परंतू अद्याप त्यांचेकडून तशी अनुमती प्राप्त झालेली नाही.

तसेच मा. केंद्रीय सहकार आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक आहे. सबब, दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन केले आहे. स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीविषयक नियमांच्या अधीन राहून या वार्षिक सभेचे नियोजन केले जाईल याची कृपया नोंद घ्यावी ही नम्र विनंती. त्यामुळे प्रथम येणा-या सभासदास प्रथम या तत्वाने प्रवेश दिला जाईल याची नोंद घ्यावी ही विनंती.

या सूचनेद्वारे सर्व “सर्वसाधारण सभासदांना (Ordinary Members)” कळविण्यात येते की, बँकेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी, सकाळी ठीक ०९.३० वाजता, होरायझन हॉल, मानपाडा रोड, डि-मार्टचे जवळ, डोंबिवली (पूर्व) येथे पुढील कामकाजाचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे.

सभेपुढील कामकाजाचे विषय –

१) संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१-०३-२०२१ अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक व नफा वाटणी मंजूर करणे आणि वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचा दोष दुरुस्ती अहवाल (Compliance Report) सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.

३) रिझर्व्ह बँकेच्या मंजूरीस अधीन राहून, संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.

४) रिझर्व्ह बँकेच्या संमतीस अधीन राहून, २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक नेमण्याचे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार, संचालक मंडळास देणे.

५) दि. ३१ मार्च २०२१ अखेर संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (केवळ त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जांच्या तपशीलाची नोंद घेणे.

६) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने, आयत्या वेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
गो. गि. परांजपे
सरव्यवस्थापक

दिनांक :१५ सप्टेंबर, २०२१.

टीप –

१) गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी १०.०० वाजता भरेल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील अगर हिशेब विषयक अन्य माहिती विचारावयाची असेल, त्यांनी कृपया दि. २३ सप्टेंबर, २०२१ पर्यंत सरव्यवस्थापकांकडे लेखी विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल.

३) बँकेचा २०२०-२१ चा वार्षिक अहवाल बँकेची वेबसाईट www.dnsbank.in येथे उपलब्ध आहे. अहवालाची छापील प्रत दि. २० सप्टेंबर, २०२१ पासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल.

महत्वाच्या सूचना

१) बँकेच्या उपविधींनुसार ज्या सभासदांचे ₹ १,५००/- पेक्षा कमी रक्कमेचे भाग-भांडवल आहे त्यांनी कृपया आवश्यक रक्कमेचा भरणा करून किमान ३० शेअर्सची एकूण ₹ १,५००/- पर्यंत रक्कम त्वरित पूर्ण करावी. अन्यथा अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करावे लागते.

२) पत्त्यातील बदल शेअर्स विभागास लगेचच कळवावा. तसेच आपला ई-मेल shares@dnsb.co.in या मेलवर कळवावा ही विनंती.

३) शेअर्सवरील लाभांश दरवर्षी आपल्या खात्यात जमा होतो आहे याकडे कृपया लक्ष द्यावे. आपण अद्याप लाभांश घेतला नसल्यास तो त्वरित घेण्यात यावा. बँकेच्या उपविधींनुसार, तीन वर्षांमागील (म्हणजेच सन २०१७-१८ व २०१८-१९ च्या बाकी असलेल्या लाभांशाची) रक्कम दि. ३१-०३-२०२२ पर्यंत न घेतल्यास, बँकेच्या राखीव निधीत वर्ग करावी लागते.

४) घेतलेल्या शेअर्सकरीता कृपया नामनिर्देशन (नॉमिनेशन) करण्यात यावे. याकरीताचे फॉर्मस सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.,

५) कृपया आपण सभासद असल्याचे ओळखपत्र मागून घ्यावे. ओळखपत्रासाठी, आपले २ पासपोर्ट साईज रंगीत फोटो आवश्यक आहेत.

६) शेअर्स संदर्भातील पत्रव्यवहार आपल्या शाखेमार्फत करण्यात यावा.